# 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे अनुसूचित जातीच्या चळवळीवरील राजकीय परिणाम

**प्रा.उषादेवी अंकुश कांबळे** (सहा.प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग डॉ पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, सांगली.

---

***सारांश (Abstract) :-**

1980- 90 च्या दशकामध्ये संपूर्ण जगामध्ये आर्थिक राजकारण फार मोठ्या प्रमाणात बदललेले गेलं त्याबद्दलला संपूर्ण जग सामोरे गेलं. डंकेल प्रस्ताव, GATT आणि WTO या सर्वामुळे सर्वांचेच अर्थकारण प्रभावित झाले. याचाच प्रभाव आपल्याला 1991 च्या एलपीजीचा धोरणातून दिसून येतो.परंतु यांचा प्रभाव कशाप्रकारे सर्वसामान्य लोकांवर झाला विशेषतः अनुसूचित समाजावर झाला आणि त्यांच्या राजकारण राजकारणावर झाला याचा थोडा मागवा या शोध निबंधातून घेतला गेला आहे. या शोध निबंधामध्ये 1980 च्या दशकातील अनुसूचित समाजाच्या चळवळीचे स्थिती त्यानंतर 1991 चे एलपीजीचे धोरण कोणत्या स्वरूपाचे होते त्याची वैशिष्ट्ये विशद केली आहेत.पुढे या धोरणाच्या स्वरूपावरून अनुसूचित समाजाला झालेला फायदा तोटा सांगितला आहे आणि अनुसूचित समाजाच्या चळवळीवर नेमका कोणता परिणाम झाला हे विस्तृतपणे विवेचन केले आहे.

***प्रस्तावना (Introduction) :-**

शतकानुशतके दारिद्र्यात पिचत पडलेल्या अन्याय सहन करणाऱ्या लोकांना अनुसूचित समाज किंवा दलित असे म्हटले जाते. अनेक विचारवंतांनी या लोकांचे जगणे सुसह्य करण्यासाठी चळवळ केली कार्य केले. भारतीय जनतेने सर्वांना समान संधी आणि अधिकार दिले.1950 नंतर अनुसूचित समाजाच्या चळवळीने जोर धरला त्यानंतर 1980 मध्ये ब्लॅक पॅंथरच्या माध्यमातून अनुसूचित समाजाचा आवाज वाढू लागला. मात्र यानंतर झालेल्या 1991 च्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणानंतर आपणास बदल झालेला जाणवतो. हा बदल नेमका कोणत्या स्वरूपाचा आहे याचा अभ्यास सदर शोध निबंधातून घेण्यात आला आहे.

***उद्दिष्टे (Objectives) :-**

सदर शोध निबंध हा आर्थिक राजकारणातील असून सामान्य लोकांच्या जीवनाशी संबंधित आहे या शोधनिबंधात पुढील उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत.

1) 1991 च्या आर्थिक उदारीकरणाची चर्चा करणे.

2)एलपीजी म्हणजे काय हे समजून घेणे.

3)या धोरणाचे फायदे तोटे तपासून बघणे.

4)अनुसूचित समाजावर याचा परिणाम काय झाला हे पाहणे.

***विषयाची मांडणी :-**

1980- 90 च्या दशकात जगात सर्वत्र आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री ज्येष्ठ अर्थतज्ञ मनमोहन सिंग यांनी जागतिक बाजारपेठेचा अभ्यास करून 24 जुलै 1991 या दिवशी संसदेत अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी उदारीकरणाचे धोरण भारतासाठी निश्चित केले. या धोरणातून एलपीजी म्हणजेच उदारीकरण(Liberization),खाजगीकरण(Privatisation) आणि जागतिकीकरण(Globalization) या संकल्पना अमलात आणल्या गेल्या. प्रथम या संकल्पना नक्की काय आहेत ते समजून घेऊ.

***LPG चे तत्त्व:-**

1980 च्या सुमारास भांडवलदारीत प्रचंड वाढ झाली. विकसित देशांना विकसनशील देशांची बाजारपेठ काबिज करायची होती. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या संघटना स्थापन केल्या गेल्या, वेगवेगळे करार केले गेले त्याचाच एक परिणाम म्हणजे जागतिक व्यापार संघटना आणि गेट करार या करारानुसार आणि आपल्या 1991 च्या धोरणानुसार आपण एलपीजीचे तत्व स्वीकारले.

A) आर्थिक उदारीकरण (Liberization) :- पूर्वी कोणत्याही परकीय व्यापारी कंपन्यांना भारतात व्यापार करण्याची किंवा गुंतवणूक करण्याची परवानगी नव्हती याबाबतीत भारत सरकारचे कडक कायदे होते.या धोरणानुसार

परकीय व्यापारी कंपन्यांना भारतात व्यापार आणि गुंतवणूक करण्याची परवानगी मिळाली. तसेच जाचक अटी रद्द करून सहज सुलभ ,शिथिलता आणली.

B)खाजगीकरण(Privatisation) :-

1991 चा धोरणाचे सर्वात विवादास्पद तत्व म्हणजे खाजगीकरण सरकारने सर्व महत्त्वाच्या संस्था आणि कंपन्या ज्या सरकारच्या किंवा सार्वजनिक मालकीच्या होत्या त्याचे खाजगीकरण केले गेले. यासोबतच ज्यांना व्यवसाय कारखाने स्थापन करायचा आहे त्यांना खाजगी तत्त्वावर परवानगी दिली गेली त्यामुळे खाजगी व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ झाली.

C) जागतिकीकरण(Globalization) :-

**जागतिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये सर्व देशांमध्ये व्यापार आणि गुंतवणुकीसाठी इतर देशासाठी** परवानगी देण्यात आली. या प्रक्रियेमुळे जागतिक खेडे(Global Village) असे जगाला म्हटले जाते. भारताने ही उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून जागतिकीकरण स्वीकारले. 1991 च्या आर्थिक धोरणाचे परिणाम या आर्थिक धोरणानुसार भारतात अनेक आर्थिक सामाजिक राजकीय परिणाम झाले हे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील

आर्थिक परिणाम ----

1)खाजगी उद्योगधंद्यात प्रचंड वाढ झाली.
2)परकीय व्यापारी कंपन्या(MNCs) भारतात आल्या.
3)लोकांना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या.
4)व्यापार विषयक अटींमध्ये शिथिलता आणल्यामुळे छोट्या मोठ्या व्यवसायांना प्रोत्साहन मिळाले.
5)सांस्कृतिक, कारागिरी, कलात्मक वस्तूंना मागणी वाढली.
6)सेवा क्षेत्रात प्रचंड वाढ झाली.
7)देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होऊन विकासदर वाढला.
8)भारतीय व्यावसायिकांना इतर देशांमध्ये व्यापाराच्या आणि गुंतवणुकीच्या संधी प्राप्त झाल्या.

सामाजिक परिणाम----

1) परकीय कंपन्या भारतात आल्यामुळे त्यांचे जीवनमान भारतीय कडून उचललेले जाऊ लागले.
2)व्यवसायात वाढ झाल्यामुळे लोकांच्या हातात पैसा राहू लागला ज्यामुळे लोकांचा सामाजिक दर्जा वाढला.
3)आरोग्य विषयक वस्तूमध्ये वाढ झाली.
4)बालमजुरांची संख्या वाढली.
5) या धोरणाला अनुसरून शैक्षणिक सुधारणा झाली.
6)नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढले.
7)भारतीय कला, खाद्यपदार्थ,कपडे यांची मागणी वाढली.
8)व्यवसायात आणि नागरीकरणात वाढ झाल्यामुळे एकल कुटुंबांची संख्या वाढली.
9)मॅकडोनाल्डायजेशन - लोकांना घरी जेवण्याचे किंवा जेवण बनवण्याची सवय कमी होऊन हॉटेल व्यवसायात वाढ झाली.
10)शेतीचे क्षेत्र घटले गेले त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली.
11) वालमार्टायझेशन- शहरांमध्ये किराणामालाची दुकाने कमी होऊन वॉलमार्ट, डी मार्ट अशा मॉल्स ची संख्या वाढली. लोकांना चकाकत्या ब्रँडचे आकर्षण निर्माण झाले.
12)लोकांचे पाश्चात्य जगाच्या प्रभावामुळे अंधानूकरण वाढले.
13)परकीय कंपन्यामुळे आणि जागतिकीकरणामुळे देशी व्यावसायिका पुढे आव्हाने वाढली आणि दर्जा राखण्याला महत्त्व प्राप्त झाले त्यामुळे छोट्या व्यावसायिकांच्या अडचणीत वाढ झाली.
14)जागतिकीकरणामुळे लोकांच्या शैक्षणिक तसेच व्यावसायिक कौशल्यामध्ये वाढ झाली.

***1991 च्या आर्थिक धोरणाचे अनुसूचित समाजाच्या चळवळीवर झालेले राजकीय परिणाम :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर ज.वी.पवार,राजा ढाले यांनी दलित पँथरची स्थापना केली. या संघटनेचा जोर 1977 पर्यंत कायम राहिला. परंतु नंतर गटातटाचे राजकारण सुरू होऊन पक्षांतर्गत फूट पडली. दलित पँथर अस्ताव्यस्त

झालेले असतानाच 1991 मध्ये आर्थिक सुधारणा कायदा आला आणि यानंतर अनुसूचित समाजात आणि चळवळीत मोठी स्थित्यंतरे येत गेली. आधीच चर्चा केल्यामुळे केल्याप्रमाणे ज्याप्रमाणे सामान्य लोकांवर या धोरणाचा आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम झाला तोच परिणाम थोड्याफार प्रमाणात अनुसूचित समाजावर झाला. परंतु आर्थिक धोरणाचा परिणाम राजकीय दृष्ट्या अनुसूचित समाजावर कसा झाला त्याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

*आर्थिक धोरणाचा अनुसूचित समाजाच्या चळवळीवर झालेला राजकीय परिणाम:-

1) भारतीय घटनेने जरी समान नागरिक मानलेले असले तरी सवर्ण हिंदू लोकांनी कधीच जवळचे मांडले नाही.

2)उदारीकरण धोरणामुळे लोकांच्या हातात पैसे येऊ लागला.परंतु चळवळीकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

3)भांडवलदार आणि राजकीय नेते यांची फार मोठ्या प्रमाणात हात मिळूनी झाली यामध्ये अनुसूचित समाजाच्या चळवळीला मागे टाकले गेले.

4)अनुसूचित समाजामध्ये नोकरीच्या आणि शिक्षणाच्या सवलती असूनही समाजातील एकूण लोकसंख्येपैकी 2011 च्या जनगणनेनुसार 78% शेतमजूर आणि दहा टक्के औद्योगिक कामगार म्हणून कार्य करत आहेत.

5)चळवळीतील नेत्यांचे समाजाकडे दुर्लक्ष होऊन ते इतर राजकीय पक्षांच्या किंवा नेत्यांच्या वळचणीला गेलेले दिसतात.

6) अनुसूचित समाजाच्या चळवळीने समानतेचा सवलतीचा फायदा घेऊन इतर धर्मियांचा जाती जमातीचा विश्वास संपादन करायला हवा होता तो त्यांनी कधीच केला नाही.

7)अनुसूचित समाजाच्या चळवळीचे राजकारण अजूनही बुद्ध आणि आंबेडकर यांच्यावरच आधारलेले आहे.

8)चळवळीतील नेत्यांनी इतर पक्षांच्या नेत्यांच्या आश्रयाला जात तडजोडी केल्यामुळे आता त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव बोथट झाली आहेत.

9)काही अनुसूचित समाजातील नेते फक्त वादाचीच भाषा बोलतात अशांनी राजकारण पुढे जात नाही काही ठिकाणी सौजन्य आणि कृतज्ञता ही महत्त्वाची असते हे त्यांच्या लक्षात येत नाही.

10)जोपर्यंत अनुसूचित समाज विशेषतः लेखक, कवी, संशोधक वाद विवाद पटू, कलावंत, साहित्यिक, नेते हे समाजात गंड सोडून आत्मविश्वासाने वावरत नाहीत तोपर्यंत अनुसूचित समाजाचा आणि चळवळीचा विकास होत नाही.

11)सध्याला भांडवलदार आणि काही बडे नेते यांच्याकडून धर्माच्या नावावर राजकारण केले जात आहे आणि इतर आमिषेदाखवून अनुसूचित समाजाच्या नेत्यांना त्यांच्याकडे वळवले जात आहे त्यामुळे चळवळ निष्प्रभ पडत आहे.

***सारांश(Conclusion) :-**

या धोरणामुळे लोकांच्या हातात थोडाफार पैसा येत आहे परंतु गरीब-श्रीमंतीतली दरीसुद्धा प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. इतर बड्या नेत्याकडून फायद्यासाठी चळवळीतील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा फक्त वापर करण्यात येत आहे. तसेच आता इतर समाजाच्या चळवळीने जसा जोर धरलेला आहे तसाअनुसूचित समाजाचा चळवळीचा प्रभाव दिसून येत नाही. त्यावर समाजाने आणि चळवळीतील नेत्याने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. अजूनही अनुसूचित समाजापुढे अन्याय, बेरोजगार, आर्थिक -सामाजिक प्रश्न उभे आहेत यावर चिंतन करून पुन्हा एकत्र येऊन लढा देणे गरजेचे आहे.

***संदर्भ(References) :-**

1) Dalit in Modern Times- Michael

2) Impact of Economical Reform policies on Dalit and Weaker Sections- Thakur and Anil Kumar

3) रावपर्व- आर्थिक मन्वांतराचे शिल्पकार- प्रशांत दिक्षित

4) दलित पॅंथर शरणकुमार लिंबाळे

5) दैनिक लोकसत्ता

6) दैनिक सकाळ

7) दैनिक लोकमत

8) दैनिक पुढारी